# महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी अवलंबित विश्वस्त संस्था

४ था मजला, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

जा.क्र.: का.औ.सं.वि./मानिभ/ ६६३९

दिनांक : ०७/०३/२००६

## परिपत्रक

विषय :- मृत कर्मचा-यांच्या अवलंबिताना बाह्यस्त्रोताद्वारे रोजंदारी कामगार म्हणून देण्यात आलेल्या / देणा-या नेमणूकींबाबत.

**************

तिन्हीं कंपनीमधील मृत कर्मचा-यांच्या अवलंबितांना अथवा जे कर्मचारी वैद्यकीय कारणास्तव वयाच्या ५० व्या वर्षापूर्वी निवृत्ती घेतलेली आहे अशा कर्मचा-यांच्या अवलंबितांना मासिक निर्वाह भत्ता रु.२०००/- दरमहा मंजूर करण्यात येतो. अशा अवलंबितांना प्रत्येक महिन्यामध्ये त्यांनी दहा दिवस काम केल्यानंतर त्यांना धनादेश अदा करण्यात येतात. तथापि, विश्वस्त संस्थेकडे उपलब्ध असलेल्या निधीचा विचार करता मासिक निर्वाह भत्त्याची रक्कम त्या पुरतेने जास्त असल्यामुळे अशा अवलंबितांची संख्या पटलातून कमी होण्यासाठी त्यांना बाह्यकंत्राटी पध्दतीने कामे देण्यात यावे असे सर्व क्षेत्रीय कार्यालयांना परिपत्रक क्र.कावि/२८२५९ दिनांक २५.०८.२००६ अन्वये कळविण्यात आलेले होते. वरील परिपत्रकाद्वारे जास्तीत जास्त अवलंबिताना बाह्यस्त्रोताद्वारे रोजंदारीवर नेमणूका देण्याविषयी सूचना देण्यात येवून सुध्दा काहीं मोजक्याच परिमंडलाने वरील परिपत्रकाची अंमलबजावणी केलेली आहे. तथापि, महावितरण कंपनीमधील बहुतेक क्षेत्रीय कार्यालयांनी वरील परिपत्रकामध्ये दिलेल्या सूचनांचे कोणत्याही प्रकारे अंमलबजावणी केलेली दिसत नाही.

या परिपत्रकाद्वारे पुन्हा एकदा विनंती करण्यात येत आहे की, मासिक निर्वाह भत्ता मिळण्यास पात्र असलेल्या अवलंबितांना, त्यांनी धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेच्या योग्यतेनुसार, महावितरण कंपनीमध्ये जी कामे कंत्राटदाराकडून करवून घेण्यात येतात अशी कामे अवलंबितांमार्फत बाहयकंत्राटी पध्दतीने करवून घेण्यात यावीत आणि जास्तीतजास्त अवलंबितांना त्याचा लाभ देण्यात यावा, ज्यामुळे मासिक निर्वाह भत्ता घेणा-या/मागणी करणा-या अवलंबितांची संख्या कमी होण्यास मदत होऊन ज्यांना त्यांच्या शिक्षणामुळे किंवा इतर काही कारणामुळे बाहयकंत्राटी पध्दतीने काम मिळत नसेल अशा प्रलंबित असलेल्या अवलंबितांच्या प्रकरणांचा मासिक निर्वाह भत्ता मंजूर करण्यासाठी विचार करता येईल. यापूर्वी वरील परिपत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे ज्या अवलंबितांना बाह्यस्त्रोताद्वारे रोजंदारीवर नेमणूका देण्यात आलेल्या आहेत किंवा देण्यात येतील त्यांना खालीलप्रमाणे आर्थिक लाभ मिळण्यास ते पात्र होतात.

१) परिपत्रक क्र.२८२५९ दि.२५.०८.२००६ अन्वये कंत्राटीपध्दतीने काम करणा-या अवलंबिताना किमान वेतनाच्या प्रतिदिन वेतन दर निश्चिती केल्याप्रमाणे वेतन देण्यात यावे.

२) त्यांच्या वेतनातून प्रचलित नियमानुसार अंशदायी भविष्य निर्वाह निधीची रक्कम कपात करण्यात यावी व त्यामध्ये महावितरण कंपनीचा वाटा समायोजित करुन एकूण रक्कम म.रा.वि.मंडळ अंशदायी भविष्य निर्वाह निधी विश्वस्त संस्थेकडे जमा करावी.

३) अवलंबिताना देण्यात येणा-या वेतनातून कामगार राज्य विमा योजना अंतर्गत १.७५ टक्के रक्कम वसूल करावी व त्या मध्ये ४.७५ टक्के रकमेचा कंपनीचा वाटा समाविष्ठ करुन ही एकत्रित रक्कम स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेत कामगार राज्य विमा महामंडळ यांच्या नावावर काढलेल्या चलनाद्वारें नियमितपणे भरणा करावी.

या परिपत्रकाद्वारे काही अधिक सूचना पुन्हा एकदा महावितरण कंपनीमधील सर्व क्षेत्रिय कार्यालयांना त्यांच्या माहितीसाठी व योग्यत्या कार्यवाहीसाठी व अंमलबजावणीसाठी देण्यात येत आहेत.

१) ज्या अवलंबितांना नेमणूका दिलेल्या आहेत अशा अवलंबितांनी बाह्यस्रोतावर त्यानंतर काम करण्यास नकार दिल्यास त्यांना पूर्वीप्रमाणे १० दिवस काम करण्यास परवानगी देण्यात येवू नये आणि असे अवलंबित मासिक निर्वाह भत्ता रु.२०००/- मिळण्यास अपात्र ठरतील. तथापि, अशा अवलंबितांना त्यांच्या ज्येष्ठतेनुसार रिक्त असलेल्या पदावर नेमणूकीसाठी त्यांचा हक्क अबाधित राहील.

२) बाहयस्रोताद्वारे रोजंदार कामगार म्हणून नेमणूका देताना नेमणूकीचा कालावधी हा कमीतकमी प्रथमतः एक वर्षाचा असावा याची खबरदारी संबंधित सक्षम अधिका-यानी घ्यावी.

३) काही प्रशासकीय कारणास्तव किंवा कामाची व्याप्ती लक्षात घेता बाह्यस्रोताद्वारे नेमणूका दिलेल्या अवलंबितांना एक वर्षाचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वीच कामावरुन कमी करणे आवश्यक असल्यास विश्वस्त संस्थेकडे त्याची माहिती पाठविण्याची तजविज तावडतोब करावी व विश्वस्थ संस्थेने हया बाबत सूचना दिल्यानंतर अशा अवलंबितांना १० दिवस काम देण्यासाठी स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात यावी.

महावितरण कंपनीतील सर्व संबंधित अधिका-यांना दि.३०.०९.२००८ रोजी विश्वस्त संस्थेच्या झालेल्या बैठकीतील निर्णयाप्रमाणे या परिपत्रकाद्वारें पुन्हा एकदा असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी मृत कर्मचा-यांच्या अवलंबितांना अथवा जे कर्मचारी वैद्यकीय कारणास्तव वयाच्या

५० व्या वर्षापूर्वी निवृत्ती घेतलेली आहे अशा मासिक निर्वाह भत्ता घेत असलेल्या अथवा ज्यांची प्रकरणे विश्वस्थ संस्थेकडे मंजूरीसाठी पाठविलेली आहेत त्यांना बाह्यस्रोताद्वारे रोजंदारी कामगार म्हणून नेमणूका देण्यात याव्यात व अशा अवलंबितांची माहिती विश्वस्थाच्या कार्यालयास तावडतोब कळविण्यात यावी.

सदरचे परिपत्रक कार्यकारी संचालक (मा.सं) यांच्या मान्यतेनुसार प्रसृत केले आहे.

७-३-०८

मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी व
सदस्य सचिव, म.रा.वि.म.क.अवलंबित विश्वस्त संस्था

प्रति :- प्रेषणयादीप्रमाणे महावितरण कंपनीतील अधिकाऱ्यांना
- प्रत्येक परिमंडलातील मासिक निर्वाह भत्ता घेत असलेल्या अवलंबितांना या परिपत्रकाच्या प्रती हस्तांतरीत करण्याच्या दृष्टीने सोबत जोडल्या आहेत. त्या प्रती त्यांच्या माहितीसाठी हस्तांतरीत करण्यात याव्यात.